पुढारी

# शिवाजी विद्यापीठ अधिसभेवर धैर्यशील यादव यांची नियुक्ती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**




शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर अध्यापकेतर सेवक धैर्यशील यादव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमानुसार विद्यापीठाच्या सेवेतील अध्यापकेतर एका व्यक्तीचे नामनिर्देशन कुलगुरू करतात. नुकतेच यादव यांना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी नियुक्तीचे पत्र दिले आहे. यादव सध्या वित्त व लेखा विभागात कार्यरत असून, विद्यापीठाच्या अतिथीगृहाचा अधिकचा कार्यभार सांभाळत आहेत. विद्यापीठाच्या हीरकमहोत्सवी वर्षाचा विद्यापीठाचा 'उत्कृष्ट कर्मचारी अवॉर्ड' देऊन त्यांना नुकतेच विद्यापीठाने सन्मानित केले आहे. २००१ च्या विद्यापीठाच्या शैक्षणिक जडणघडणीत नॅकसारख्या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे.

पुण्यनगरी

# अधिसभेवर धैर्यशील यादव नियुक्त



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सेवेतील अध्यापकेतर विभागातून धैर्यशील यादव यांची अधिसभा सदस्यपदी नियुक्ती झाली. यादव सध्या वित्त व लेखा विभागात कार्यरत असून, विद्यापीठाच्या अतिथीगृहाचा अधिकचा कार्यभार सांभाळत आहेत. विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी वर्षातील सर्वोत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. सेवक संघावर कार्यकारिणी सदस्य, सल्लागार सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, कुलसचिव व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले, सहायक कुलसचिव डॉ. वैभव ढेरे, अभिजित रेडेकर, एम. जे. पाटील यांचे सहकार्य लाभले.

सकाळ

# यादव यांची 'सिनेट'वर नियुक्ती

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) धैर्यशील यादव यांची नियुक्ती झाली आहे. त्याबाबतचे पत्र त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिले. यादव हे सध्या विद्यापीठातील वित्त व लेखा विभागात कार्यरत आहेत.

विद्यापीठाच्या हीरक महोत्सवी वर्षाचा 'बेस्ट एम्प्लॉई अॅवार्ड' देऊन त्यांना सन्मानित केले आहे. त्यांनी पर्यावरणपूर्वक कामकाजाच्या दृष्टीने सीलबंद पाण्याच्या प्लास्टिक बॉटल बंद करून स्टील तांब्या भांडे वापरणे, विद्यापीठ आणि महाविद्यालयांतर्गत



धैर्यशील यादव

परिपत्रके ईमेल द्वारे पाठवण्यासाठी पाठपुरावा करून त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहेत. त्यांना प्र- कुलगुरू पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखा अधिकारी अजित चौगुले, विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले, डॉ. वैभव ढेरे, अभिजित रेडेकर, एम. जे. पाटील यांचे सहकार्य लाभले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात मराठी भाषासंवर्धन पंधरवडा निमित्त विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागामार्फत २८ जानेवारीपर्यंत मराठी भाषासंवर्धन पंधरवडा साजरा केला जात आहे. यानिमित्ताने मराठी विभागाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. यात लेखक संवाद, ग्रंथ चर्चा, व्याख्यान यांचा समावेश आहे.

लेखक संवाद कार्यक्रमांतर्गत साहित्यिक कृष्णात खोत, गौतमीपुत्र कांबळे, किरण गुरव, सदानंद कदम यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. 'नवी संवेदना - नवी कविता' या विषयावर कवी संजीव खांडेकर यांच्याशी मुक्तसंवाद कार्यक्रम होईल. दि. २३ रोजी वसंत गायकवाड लिखित 'तथागत गौतम बुद्ध' या ग्रंथावर चर्चा आयोजित केली आहे. यात साहित्यिक राजन गवस, डॉ. प्रकाश पवार विचार मांडणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत, अशी माहिती मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी दिली.

18 JAN 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भोवताल

# चिलापी आणि नद्या प्रदूषण

डॉ. व्ही.एन. शिंदे

पर्यावरणात सजीव-निर्जीव दोन्ही घटकांचा समावेश होतो. त्यातील सर्वात महत्त्वाचा घटक पाणी. पाणी केवळ सजीवांची मूलभूत गरज नाही, तर सजीवांची निर्मितीच पाण्यात झाली. डार्विनचा उत्क्रांतीवाद जगाने स्वीकारला आहे. त्यानुसार पृथ्वीवर पहिला जीव तयार झाला, तो एकपेशीय अमिबा. त्यापासून पुढे बहुपेशीय जीवांची निर्मिती झाली. पाण्यामध्ये प्रथम शैवाल, जलचर तयार झाले. त्यानंतर वनस्पती, झाडे, उभयचर, प्राणी आणि पक्षी तयार झाले. त्यांच्या जगण्यासाठी आवश्यक घटकांची निर्मितीही त्यासोबत होत होती. पाण्यात निर्माण झालेल्या सजीवांची पाण्याची गरज मोठी असते. सजीवांतील विविध घटकांचा विचार केला, तर त्यामध्ये पाण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

सजीवांतील पाण्याचे प्रमाण सरासरी ९० टक्के इतके असते. मानवाच्या शरीरात, हाडांसह सर्वच भागांमध्ये पाण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. लहान बाळाच्या शरीरात ७५ टक्के पाणी असते. प्रौढ पुरुषात ६०, तर महिलांमध्ये ५५ टक्के असते. स्नायू आणि मूत्रपिंडात ९८ टक्के पाणीच आहे, हृदय आणि मेंदूत ७३ टक्के आहे. कातडीत ६४, तर हाडात ३१ टक्के पाणीच आहे.

असे हे पाणी. सजीवांना शुद्ध रूपात उपलब्ध व्हावे, यासाठी निसर्गाने स्वतःची रचना केलेली असते. पृथ्वीवरील पाण्याची वाफ होते. ती वाफ हलकी असल्याने आकाशात जाते. त्या वाफेचे ढग बनतात. ढगाना थंड हवा लागताच वाफेचे रूपांतर पाण्यात होते. हेच जलबिंदू पावसाच्या रूपात पृथ्वीवर अमृताच्या रूपात येतात आणि वसुंधरा पुन्हा हिरव्या रंगात सजते. पावसाच्या रूपात उपलब्ध होणारे पाणी शुद्ध असते. मात्र, ते मानवाने पिण्यास वापरले तर तो जगू शकत नाही. पावसाचे पाणी जमिनीवर पडल्यावर त्यामध्ये अनेक क्षार मिसळतात आणि ते पाणी मानव पिण्यासाठी वापरू शकतो. जे पाणी शुद्ध म्हणून आपण पितो, ते वैज्ञानिकदृष्ट्या अशुद्ध असते. शुद्ध पाणी म्हणजे निव्वळ हायड्रोजन आणि ऑक्सिजन या दोन मूलद्रव्यांचे संयुग. गंमत अशी की, यातील हायड्रोजन हा तीव्र ज्वालाग्राही वायू; तर ऑक्सिजन ज्वलनाच्या प्रक्रियेतील आवश्यक घटक. ज्वलनशील आणि ज्वलनपूरक अशा दोन मूलद्रव्यांचे पाणी बनते. ते जगण्यासाठीची मूलभूत गरज असल्याने त्याला 'जीवन' असेही म्हणतात.



पंचगंगेचे प्रदूषित पात्र.

निसर्गातील प्रत्येक घटकाला शुद्ध रूपात राखण्याची निसर्गतः एक यंत्रणा विकसित झालेली असते. पाण्यातही ही यंत्रणा कार्यरत असते. काही वनस्पती पाण्याच्या तळाशी उगवतात आणि पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कायम ठेवण्यासाठी प्रयत्न करतात. काही जलचर पाण्याबरोबर वाहून येणारे इतर मृत जीव खाऊन पाण्याला प्रदूषित होण्यापासून वाचवतात. स्थानिक मासे यात अग्रेसर असायचे. मात्र, आज तेही नामशेष होत चालले आहेत. याला कारण केवळ मानवी स्वार्थ आहे. या स्वार्थातून होणारे खाणकाम, डोंगर खोदाई, कारखाने, नागरी वस्त्या आणि अनिर्बंध बांधकामे यांचा वाटा सिंहाचा आहे.

पाणी मानव आणि एकूण जीवसृष्टीच्या अस्तित्वासाठी सर्वात महत्त्वाचे. मात्र, पाण्याच्या संरक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. या पाण्याची जगण्यासाठी असणारी गरज ओळखून मानवी संस्कृतीचा विकास नद्यांच्या काठावर झाला. वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडू लागले म्हणून तलाव बांधले. पाणी पिण्याखेरीज स्वच्छतेसाठीही वापरले जाते. कारखाने आणि शेतीसाठीही वापरले जाते. स्वच्छतेसाठी, कारखाने आणि उद्योगांसाठी वापरलेले पाणी अशुद्ध रूपात पुन्हा स्वच्छ पाण्यांच्या साठ्यात मिसळू लागल्याने अनेक गंभीर समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत.

पंचगंगा नदी तर केवळ शंभर किलोमीटरपर्यंत जाण्याअगोदरच प्रदूषित झाली आहे. या नदीतील पाणी अगदी इचलकरंजी शहराला कोणत्याही कारणासाठी वापरता येत नाही. त्यातच दरवर्षीप्रमाणे पावसाळा संपला की पंचगंगेतील मासे मरतात. यावर्षी हा प्रश्न केवळ पंचगंगेचा न राहता अनेक नद्यांचा बनला आहे.

त्यामुळेच यावर्षीच्या भारतीय विज्ञान परिषदेच्या जानेवारी-२०२३ च्या पहिल्या आठवड्यात नागपूर येथे झालेल्या अधिवेशनातही हा प्रश्न मोठ्या प्रमाणात चर्चेत आला. या परिषदेमध्ये जल प्रदूषण वाढल्याने मासे मानवी आरोग्यास धोकादायक बनल्याचे संशोधकांनी जाहीर केले. उद्योगधंद्यातील रसायनमिश्रित पाणी नद्यांमध्ये सोडल्याने नद्यांचे, तलावांचे पाणी प्रदूषित होते. अशा रसायनमिश्रित पाण्यामध्ये वाढलेले मासे खाणे खरोखरच धोकादायक बनले आहे. 'इंडियन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रिसर्च अँड फिशरीज'चे उपमहासंचालक डॉ. जे. के. जेना यांनीच हे निष्कर्ष जाहीर केले. त्यामुळे हे निष्कर्ष अधिकृत आहेत. त्याचबरोबर वाढते तापमानही माशांच्या अस्तित्वासाठी धोकादायक बनले आहे. मागील काही वर्षांपासून सरासरी तापमानामध्ये सातत्याने वाढ होत आहे. १९९० ते २०१० या काळात सरासरी तापमान ०.९९ सेल्सियसने वाढले. मागील दहा वर्षांतील हीच वाढ १.०९ डिग्री सेल्सियस आहे. याचा परिणाम माशांचे पुनरुत्पादन आणि वाढ दोन्हीवर होतो.

मानवाने त्यातही आपला स्वार्थ शोधल्याने समस्या आणखी गंभीर बनली. जिभेचे चोचले पुरवण्यासाठी त्यामध्ये बाहेरून स्थानिक नसलेल्या माशांचे वाण आणून वाढवायला सुरुवात केली. यातीलच एक प्रजाती चिलापी. चिलापीने अन्य माशांचे अस्तित्व धोक्यात आणले आहे. पूर्वी नदीमध्ये अनेक प्रकारचे मासे बघायला मिळायचे. चिंगळ्या, आंबळी, डाकू, मरळ, सुरकी, लोळी, वांबट इत्यादी अनेक प्रकार असायचे. आता नद्या आणि तलावांमध्ये केवळ चिलापीच सापडतो. इतर माशांच्या जाती केवळ जलप्रदूषणामुळे नष्ट झालेल्या नाहीत. चिलापी इतर माशांच्या पिल्लांना फस्त करत असल्याने इतर माशांची संख्या रोडावली आहे. हा एकीकडे प्रजाती नष्ट करत असताना याची पिल्ले जर कोणी खाल्ली तर खाणारा मासा मरतो. दुसरीकडे चिलापीच्या मादीच्या पोटात कायम अंडी सापडतात. खायला आणि चवीला चांगला असल्याने पुनरुत्पादन वेगाने होत असल्याने या माशाची पैदास केली जाते. मात्र, आता चिलापी नदीच्या अस्तित्वावरच उठला आहे. चिलापी मासा स्वतः मात्र प्रदूषित पाण्यातही चांगला वाढतो. गढूळ, प्रदूषित पाण्यात टिकून राहण्याचे कसब याच्याइतके कोणीच लवकर शिकत नाही. दुसरे म्हणजे पाण्याबाहेर आल्यानंतरही हा बराच वेळ जिवंत राहतो.

चिलापीने नदीच्या पाण्यातील संपूर्ण जीवसृष्टी नष्ट करत आणली आहे. यातील डुक्कर माशासारख्या काही माशांच्या प्रजाती प्रदूषण कमी करण्यासाठी सहाय्य करणाऱ्याही होत्या. मात्र, आता त्यांचे अस्तित्व त्यांच्याच एका भावंडाने संपवत आणले आहे. पाण्याला आपण 'जीवन' म्हणत असलो तरी ते मूक आहे. त्याला बोलता येत नाही, दुःख मांडता येत नाही, विव्हळता येत नाही. स्वतःचे दुःख स्वतःच सहन करते. त्याचे बिघडलेले आरोग्य ओळखून आपणच ते सुधारायला हवे. तरच नद्या वाचतील, जीवन वाचेल; आपले आणि इतरांचेही!

vilasshindevs44@gmail.com

तरुण भारत

# विद्यापीठात मराठी भाषासंवर्धन पंधरवडा उपक्रमास प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागामार्फत २८ जानेवारीपर्यंत 'मराठी भाषासंवर्धन पंधरवडा' साजरा केला जाणार आहे. मराठी विभागातर्फे लेखक संवाद, ग्रंथ चर्चा, व्याख्यानाचा समावेश आहे. लेखक संवाद कार्यक्रमांतर्गत साहित्यिक कृष्णात खोत, गौतमीपुत्र कांबळे, किरण गुरव, सदानंद कदम यांच्याशी संवाद साधला जाणार आहे. तसेच 'नवी संवेदना-नवी कविता' या विषयावरती मराठीतील नामवंत कवी संजीव खांडेकर यांच्याशी मुक्त संवाद साधला जाणार आहे. दिनांक २३ जानेवारी रोजी वसंत गायकवाड लिखित 'तथागत गौतम बुद्ध' या ग्रंथावर चर्चा आयोजित केली आहे. यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस, राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार आपले विचार मांडणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित राहणार आहेत. वसंत गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार यांनी केले आहे.